सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्रमांक एक्स-१ मुख्य लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण या लेखाशिर्षांतर्गत वितरित करावयाच्या निधीबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: मबाआ-२०१८/प्र.क्र.६६/का-७अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१९.

संदर्भ:- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९.
२) शासन परिपत्रक,महिला व बाल विकास विभाग क्र. बीजीटी- २०१८/प्र.क्र. ३३/का-४, दि. २९ जानेवारी, २०१९.
३) सहा.आयुक्त, (नियोजन) महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. मबाविआ/नियो/उर्व. तरतुद मागणी/१८-१९/९७६ दि. १५ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना:

महिला व बाल विकास विभागंतर्गत २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण या मुख्यलेखाशीर्षांतर्गत वित विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील परिपत्रकानुसान सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पीत वार्षिक तरतुदीच्या उर्वरित अनुज्ञेय होणारा निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास मंजूरी देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता खर्च भागविणयासाठी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक २५.१.२०१९ अन्वये अर्थसंकल्पित निधीच्या खर्चाची मर्यादा महसुली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबींवर ९० टक्के व कार्यक्रम खर्चाच्या बाबीवर ८० टक्के तसेच भांडवली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबींवर ९० टक्के व कार्यक्रम खर्चाच्या बाबीवर १०० टक्के एवढी विहित करण्यात आली आहे. त्यानुसार महिला व बाल विकास विभागांतर्गत २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण या मुख्य लेखाशिर्षातंर्गत विविध लेखाशीर्षाखाली सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामधील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केल्यानुसार अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दिनांक २५.१.२०१९ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीतील बाबींची तसेच यासंदर्भात नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे काटेकोर पालन करावे.

३. याबाबत सन २०१८-१९ करीता वरील लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला निधी खर्च होईल व त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे, याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २५.१.२०१९ च्या परिपत्रकामधील तरतुदीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०२२८११५३१३१५३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: CN = Lalsing Ramchandra Gujar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Women And Child Development Department
Date: 2019.03.12 12:01:45 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे

२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर

३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर

४) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद (आयुक्तालय, पुणे मार्फत)

५) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)

६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी(आयुक्तालय, पुणे मार्फत)

७) कार्यासन(अर्थसंकल्प-३) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

८) कक्ष अधिकारी(का.४), महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
यांना सदर निधी वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

९) निवड नस्ती-का-७ अ

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग,क्र.मबाआ-२०१८/प्र.क्र.६६/का७-अ दिनांक २८.०२.२०१९
सोबतचे विवरणपत्र
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता वित्त विभागाच्या दिनांक २५.१.२०१९ च्या परिपत्रकानुसार वितरित करावयाच्या उर्वरित निधीचा तपशील

(रुपये हजारात)

अ.क्र.	योजनेचे नाव	लेखाशीर्ष	मूळ अर्थसंकल्पित निधी	या शासन निर्णयानुसार वितरित करावयाचा निधी
	२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण			
१	महिला व बाल कल्याण संचालनालय	२२३५ २५९१		
	१७-संगणक खर्च		३५००.००	३५०.००
२	इमारतींची दुरुस्ती	२२३५ २२४१		
	२७-लहान बांधकामे		२०००.००	४००.००
३	संरक्षण अधिकारी	२२३५ ए८५७		
	०६-दुरध्वनी,वीज व पाणी शुल्क		१२८२.००	३८४.६०
	१४-भाडेपट्टी व कर		४१७८.००	१२५३.४०
	१७-संगणक खर्च		७१३०.००	१४२६.००
	२०-इतर प्रशासकीय खर्च		३५९०.००	७१८.००

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: CN = Lalsing Ramchandra Gujar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Women And Child Development Department
Date: 2019.03.12 12:02:00 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन